जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 1 JUN 2026
पुण्यनगरी

# जैवविविधतेसाठी पर्यावरणपूरक जीवनशैली आवश्यक

## ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ कुंभार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

निसर्गाचे अस्तित्व मानवावर अवलंबून नाही; मात्र मानवाचे अस्तित्व निसर्गावर अवलंबून आहे. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल अबाधित राखण्यासाठी प्रत्येक नागरिकाने सजगतेने आणि जबाबदारीने वागणे अत्यावश्यक आहे. जमीन, पाणी, हवा, ऊर्जा आणि वनसंपत्ती यांचे संवर्धन केल्याशिवाय जैवविविधतेचे रक्षण होऊ शकत नाही, असे प्रतिपादन ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ सुधीर कुंभार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग आणि सामाजिक समावेशन अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'जागतिक पर्यावरण दिन-पर्यावरणपूरक जीवनशैलीसाठी मिशन लाईफ अभियान' अंतर्गत आयोजित 'समाज आणि शाश्वत विकास' या विषयावरील ऑनलाईन व्याख्यानमालेत ते बोलत होते.

सुधीर कुंभार यांनी प्लास्टिकच्या वाढत्या वापरावर नियंत्रण आणणे आणि जैवकचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावणे ही काळाची गरज असल्याचे स्पष्ट केले. अध्यक्षीय समारोपात सामाजिक समावेशन अभ्यास केंद्राचे संचालक डॉ. मुरलीधर भानारकर यांनी पर्यावरण आणि जैवविविधतेच्या संरक्षणासाठी आता केवळ चर्चा नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीची आवश्यकता असल्याचे सांगितले. डॉ. एस. ए. शिंदे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन प्रा. अविनाश भाले, डॉ. किशोर खिलारे यांनी आभार मानले. व्याख्यानास मिलिंद चिटणीस, भीमराव खाडे, दिनेश उथळे, डॉ. प्रदीप नंदावर, प्रियांका स्वामी, पलक भानारकर, गौतमी भाले, नरेंद्र देशमुख, शरद पाटील, चारू भानारकर, डॉ. विलास सोयम, राजेश मेश्राम, अंजली नामे, विश्वजित गुरव आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 JUN 2026
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाच्या आठ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे उन्हाळी सत्रांतर्गत घेण्यात येणाऱ्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसार सुरू आहेत. शनिवार, दि. ३० रोजी विद्यापीठाने विविध ८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले असून, आतापर्यंत एकूण ५४० अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत. विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील परीक्षा १ एप्रिलपासून सुरू झाल्या आहेत. शनिवारी बी.ए., बी.बी.ए., एम.सी.आयात (एम.सी.ए.), एम.टेक., बी.टेक., एम.बी.ए., बीबीए/एमबीए इंटिग्रेटेड प्रोग्राम आणि बी.आर्च अशा विविध ३९ अभ्यासक्रमांच्या परीक्षा पार पडल्या. एकूण ६७ परीक्षा केंद्रांवर झालेल्या या परीक्षांना एकूण ५ हजार ६८५ विद्यार्थ्यांनी आपली उपस्थिती लावली. दिवसभरात पी. जी. डिप्लोमा इन सेरिकल्चर, डिप्लोमा इन सेरिकल्चर, बी.बी.ए. सेमिस्टर ३ व ४, बी.एस्सी. आयटी सेमिस्टर ३ व ४ आणि बी.एस्सी. शुगर टेक्नॉलॉजी सेमिस्टर ३ व ४ या ८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 JUN 2026
लोकमत



शिवाजी विद्यापीठाचे नूतन कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांचा केआयटी अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे अध्यक्ष साजिद हुदली यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# केआयटीतर्फे नूतन कुलगुरू रजनीश कामत यांचा सत्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** केआयटी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वतीने शिवाजी विद्यापीठाचे नूतन कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांचे उत्साहपूर्ण स्वागत व सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष साजिद हुदली, उपाध्यक्ष सचिन मेनन, विश्वस्त भरत पाटील, सुनील कुलकर्णी यांनी कुलगुरूंचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या.

यावेळी कुलगुरू डॉ. रजनीश कामत, अध्यक्ष साजिद हुदली, सचिन मेनन, संचालक डॉ. मोहन वनरोट्टी यांनी मनोगत व्यक्त केले.

भेटीदरम्यान राष्ट्रीय शैक्षणिक धोरणप्रभावीपणे राबविणे, उद्योग क्षेत्रासाठी सक्षम आणि कौशल्याधारित मनुष्यबळ तयार करणे, इनोव्हेटिव्ह अध्यापन पद्धती विकसित करणे, संशोधन संस्कृती वृद्धिंगत करणे आणि रोजगारक्षम शिक्षणाला चालना देणे या विषयांवर व्यापक चर्चा करण्यात आली. (वा. प्र.)

01 JUN 2026 जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जैवविविधता टिकविण्यासाठी पर्यावरणपूरक जीवनशैलीचा अवलंब आवश्यक

• ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ सुधीर कुंभार

**जनप्रवास : कोल्हापूर**

निसर्गाचे अस्तित्व मानवावर अवलंबून नाही; मात्र मानवाचे अस्तित्व निसर्गावर अवलंबून आहे. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल अबाधित राखण्यासाठी प्रत्येक नागरिकाने सजगतेने आणि जबाबदारीने वागणे अत्यावश्यक आहे. जमीन, पाणी, हवा, ऊर्जा आणि वनसंपत्ती यांचे संवर्धन केल्याशिवाय जैवविविधतेचे रक्षण होऊ शकत नाही, असे प्रतिपादन ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ सुधीर कुंभार यांनी केले. 'समाज आणि शाश्वत विकास' या विषयावरील ऑनलाइन व्याख्यानमालेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सामाजिक समावेशन अभ्यास केंद्राचे संचालक डॉ. मुरलीधर भानारकर होते.



कुंभार यांनी पर्यावरण आणि जैवविविधतेविषयी समाजात रूढ झालेल्या अंधश्रद्धा व गैरसमजांवर भाष्य केले. पर्यावरण आणि निसर्गसंवर्धनासाठी प्रत्येकाने जबाबदारी स्वीकारण्याची गरज निर्माण झालेली आहे. साप, वटवाघूळ, मोर, अस्वल, साळिंदर, घोरपड, टिटवी यांसारख्या महत्त्वाच्या वन्यजीवांची हत्या केली जाते. अशा घटना पर्यावरणीय साखळी खंडित करून जैवविविधतेला गंभीर धोका निर्माण करतात, असे स्पष्ट केले.

एस. ए. शिंदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन प्रा. अविनाश भाले यांनी केले, डॉ. किशोर खिलारे यांनी आभार मानले. मिलिंद चिटणीस, भिमराव खाडे, दिनेश उथळे, डॉ. प्रदीप नंदावर, प्रियांका स्वामी, पलक भानारकर, गौतमी भाले, नरेंद्र देशमुख, शरद पाटील, चारू भानारकर,आदी सहभागी झाले होते.

## प्रत्यक्ष कृतीची आवश्यकता

अध्यक्षीय समारोपात डॉ. मुरलीधर भानारकर यांनी पर्यावरण आणि जैवविविधतेच्या संरक्षणासाठी आता केवळ चर्चा नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीची आवश्यकता असल्याचे सांगितले. माहिती तंत्रज्ञानाच्या झपाट्याने वाढणाऱ्या वापरामुळे निर्माण होणारा ई-कचरा ही भविष्यातील गंभीर पर्यावरणीय समस्या बनत असल्याचे त्यांनी नमूद केले.